
७

# विश्वामित्र

बी.एस.एन.कौशिक



म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : चा.वा
दा.क्र. : ९३७४

BVBK-0401314

वाच. ग्रं. वा.
१३१४
६१।८२

पुष्प ७

# महर्षी विश्वामित्र

लेखक

बी. एस. एन. कौशिक

अनुवादिका

सौ. कुमुदिनी पांढरीपांडे

BVBK-0401314

मुख्य संपादक

एल. एस. शेषगिरिराव

भारत-भारती (मराठी संस्करण)

रुईकर पथ, नागपूर–२

प्रकाशक

भारत-भारती (मराठी संस्करण) बाल पुस्तकमाला

प्रभाकर फैजपूरकर

मंत्री

श्री. बाबासाहेब आपटे स्मारक समिती

रुईकर पथ, नागपूर, महाराष्ट्र

संपादक–मराठी संस्करण

सुरेश दत्तात्रेय देशपांडे

पहिली आवृत्ती–जुलै १९८१

मूल्य रु. २–००

मुद्रक

चंद्रकांत तापस

श्री प्रसाद मुद्रण, ८ वर्धा मार्ग, नागपूर–१२

१३३९८ दि. ६।१।८२

## थोडे उपक्रमाविषयी

आपल्या पूर्वजांचे स्मरण म्हणजे कर्तृत्वाच्या प्रेरणेचा अखंड स्रोत. त्यांच्या जीवनातून आपल्याला नेहमीच बोध आणि मार्गदर्शन मिळत आलेले आहे. केवळ भारतीयांनाच नव्हे, तर जगातील साऱ्या मानवांना, आपले हे सांस्कृतिक धन म्हणजे एक कुतूहलाचा विषय आहे.

आपला गौरवशाली इतिहास ज्यांनी निर्माण केला, त्या महान व्यक्तींची जीवनचरित्रे सरळ, सोप्या आणि सहज पद्धतीने सादर करण्याचे कार्य बंगलोरच्या ‘ राष्ट्रोत्थान परिषदे ’ने सुरू केले. कन्नड आणि इंग्रजी भाषांमधून लिहिलेल्या छोट्या-छोट्या पुस्तकांच्या रूपाने हा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोचविण्याचे हे कार्य आहे. मुळात ही चरित्रे कन्नड भाषेमध्ये लिहिलेली आहेत.

नागपूरच्या ‘ श्री. बाबासाहेब आपटे स्मारक समिती ’ने या चरित्रांचे मराठी अनुवाद प्रकाशित

करण्याची जबाबदारी स्वीकारलेली असून 'भारत-भारती' (मराठी संस्करण) या उपक्रमाच्या अंतर्गत हे प्रकाशनकार्य चालू आहे.

आपले ऐतिहासिक महापुरुष, ऋषी-मुनी, सम्राट, वीर, योद्धे, साधुसंत, राजनीतिज्ञ, कलावंत इत्यादी साऱ्यांचा समावेश या पुस्तकमालेत आहे.

हा अक्षय ठेवा उमलत्या पिढीच्या स्वाधीन करीत असता त्या कार्यात आपल्यालाही काही वाटा उचलता आला, याबद्दल आम्हाला आनंद वाटतो. आपणासही हा उपक्रम आवडेल आणि आपले सहकार्य या उपक्रमास लाभेल, असा विश्वास आहे.

विनीत

**सुरेश दत्तात्रेय देशपांडे**

संपादक

# महर्षी विश्वामित्र

वसिष्ठ आणि विश्वामित्र. आपल्या प्राचीन इतिहासपरंपरेतील दोन महान विभूती.

वसिष्ठ हे महान ऋषी होते. त्यांचे अनेक गुण व प्रखर तपश्चर्या. यामुळे त्यांना 'ब्रह्मर्षी' म्हणत.

विश्वामित्र एक सम्राट होते. क्षत्रिय असूनही त्यांनी कठोरपणे नियमांचे व संयमांचे पालन केले; कारण ब्रह्मर्षिपद प्राप्त करून घेण्याची त्यांची मनीषा होती. प्रतिसृष्टी निर्माण करण्याचे सामर्थ्यही त्यांनी प्राप्त करून घेतले होते. पण ब्रह्मर्षिपद केवळ स्पर्धेने मिळत नसते; गुणांच्या आधारे स्वाभाविकपणे ते मिळते, ही गोष्ट ते विसरले.

लोकमान्य व्यक्ती आपोआपच त्या पदावर पोहचतात, याचा प्रत्यय विश्वामित्राच्या कथेतून येतो.

• • •

# महर्षी विश्वामित्र

महर्षी विश्वामित्र हे वसिष्ठ आणि भरद्वाज ऋषींचे समकालीन मानले जातात. त्यांचा जन्म कान्यकुब्ज (कनोज देश) येथे झाला. अमावसू वंशातील कुशिक राजाचे ते नातू व गाथी (पौराणिक गाधी) यांचे पुत्र होते. त्यांचे जन्मनाव विश्वरथ असे होते. पुढे क्षत्रियत्वापासून ब्राह्मणत्व प्राप्त केल्यावर त्यांना लोक 'विश्वामित्र' म्हणू लागले.

विश्वमित्र कुशिकांचे पुढारी होते. कुशिक संख्येने वरेच मोठे व अतिशय शक्तिसंपन्न होते.

सुदास नावाचा एक भरतजनांचा राजा होता. वसिष्ठ ऋषी राजपुरोहित असल्याने त्यांच्याकरवीच सुदासाचा राज्याभिषेक झाला होता. कुशिकांचे साह्य आपल्या प्रजेच्या उन्नतीस उपयुक्त ठरेल या विचाराने सुदास राजाने आपले पौरोहित्य विश्वामित्रांना दिले. राजाचे हे कृत्य स्वाभाविकच वसिष्ठ ऋषींना पसंत पडले नाही. त्यांना तो आपला अपमान वाटला.

आणि या प्रसंगापासूनच वसिष्ठ व विश्वामित्र यांच्या परस्पर संघर्षास प्रारंभ झाला. वसिष्ठांचा मुलगा शक्ती आपल्या पित्याच्या या अपमानामुळे अधिकच क्रुद्ध झाला. सुदास राजाने ज्यावेळी यज्ञ केला त्यावेळी शक्तीने विश्वामित्रांचा, वादविवादात पराजय केला. या उलट, विश्वामित्रांनी जमदग्नी ऋषींकडून प्राप्त करून घेतलेल्या 'ससर्परी' विद्येच्या बळावर शक्तीला हरविले व शेवटी सुदासाच्या सेवका-करवी त्याचा वधही केला.

विश्वामित्रांच्या साह्याने राजा सुदास याने आपल्या राज्याचा विस्तार केला. विश्वामित्रांनी राजाकडून अश्वमेध यज्ञही करविला.

महाभारतातील व पुराणांतील विश्वामित्राबद्दलच्या कथा अतिशय अद्‌भुत आहेत. विश्वामित्र हे पूर्वी महापराक्रमी क्षत्रिय नरेश होते. ते धर्मपरायणही होते. त्यांना ब्राह्मणत्व प्राप्त करून घेण्याची इच्छा झाली आणि भगीरथ प्रयत्न करून ब्रह्मर्षी होण्याची आपली महत्त्वाकांक्षा त्यांनी पूर्ण केली.

विश्वामित्रांना ब्रह्मर्षिपद तर मिळाले. परंतु त्यांचे

काम, क्रोध, मोह इत्यादी विकार कमी झाले नाहीत. त्यामुळे तत्कालीन ब्रह्मर्षिवर्ग त्यांना 'ब्रह्मर्षी' म्हणत नव्हता. विश्वामित्रांना जेव्हा या गोष्टीची जाणीव झाली तेव्हा त्यांनी उग्र तपाचरण केले. त्यांच्या तपश्चर्येचा भंग करण्यासाठी देवेन्द्राने रंभा नावाच्या अप्सरेला पाठविले. परंतु विश्वामित्र पूर्णपणे सावध असल्यामुळे ते तिच्या मोहजालात सापडले नाहीत.

महाभारतात विश्वामित्रांच्या बाबतीत आणखी एक कथा आहे. एकदा विश्वामित्रांची सत्वपरीक्षा घेण्यासाठी धर्म नावाचे ऋषी त्यांच्याकडे आले व त्यांनी विश्वामित्रांना भोजन मागितले. विश्वामित्रांनी त्यांच्यासाठी भात शिजविण्यास प्रारंभ केला व वळून पाहिले तो ऋषी तेथे दिसेनात. त्यानंतर १०० वर्षांनी धर्म ऋषी त्याठिकाणी परत आले, तेव्हा विश्वामित्र त्यांची वाट पाहत तसेच उपाशी व तृषित अवस्थेत बसलेले त्यांना आढळले. धर्म ऋषींनी उत्स्फूर्तपणे त्यांची प्रशंसा करून त्यांना 'ब्रह्मर्षी' असे संबोधिले.

विश्वामित्र आणि वसिष्ठ यांच्यातील विवादाची कथाही अद्भुत आहे. सम्राट विश्वामित्राची त्यांच्या शौर्याविषयी सर्वदूर ख्याती होती प्रजेच्या मनातही

त्यांच्याविषयी अत्यंत आदर होता. एकदा आपले सैन्य बरोबर घेऊन ते भ्रमणार्थ निघाले. त्यांचे सैन्य बरेच मोठे होते. हिंडता-हिंडता त्यांनी एका वनात आपला तंबू घातला. त्या घनदाट अरण्यात वनातील हिंस्र पशूंबरोबर इतर पशूंना निर्भयतेने संचार करताना पाहून विश्वामित्रांना मोठे आश्चर्य वाटले. थोडे अंतर पुढे गेल्यावर अत्यंत शांत असे वातावरण पाहून ते अतिशय प्रसन्न झाले. पाहतात तो तेथे एक आश्रम त्यांच्या दृष्टीस पडला. तो वसिष्ठ ऋषींचा आश्रम होता. तेव्हा त्यांना कळून आले की या ऋषींचाच हा प्रभाव आहे.

**वसिष्ठांच्या आश्रमात**

विश्वामित्राच्या आगमनाची सूचना मिळताक्षणीच वसिष्ठांनी अत्यंत आदरपूर्वक त्यांना आश्रमात आणले. त्यांचा आतिथ्यसत्कार केला. विश्वामित्रांबरोबर त्यांचे विशाल सैन्यही आहे, हे जेव्हा वसिष्ठांना कळले तेव्हा मुनिश्रेष्ठ वसिष्ठ त्यांना म्हणाले, "महाराज आपण सर्वांनीच माझ्या आतिथ्याचा स्वीकार करावा."

वसिष्ठांच्या या भाषणावर विश्वामित्र हसले. वनातील एका लहानशा आश्रमात इतक्या मोठ्या

सैन्याची व्यवस्था कशी होऊ शकेल, या विचाराने विश्वामित्र म्हणाले, "महामुने, माझ्याबरोबर केवळ शेपन्नास नाही तर पूर्ण एक अक्षौहिणी सैन्य आहे." अक्षौहिणी सेना म्हणजे २१८७० रथ, तितकेच हत्ती, ६५६१० घोडेस्वार तसेच १०९३५० पायदळ (सैन्य). इतके सर्व पशू व तितकेच सैनिक या सर्वांची व्यवस्था आश्रमात होणे केवळ अशक्य, या जाणिवेने विश्वामित्रांनी वसिष्ठांच्या सूचनेचा स्वीकार केला नाही. परंतु वसिष्ठांचा आग्रह सुरूच होता. इतकेच नाही तर त्यांनी तावडतोब सर्व व्यवस्थाही केली. विश्वामित्रांना या गोष्टीचे फार नवल वाटले.

## नंदिनीचे सामर्थ्य

वसिष्ठांच्या आश्रमात नंदिनी नावाची एक गाय होती. ती कामधेनूची मुलगी होती. रामायणात तिचा शबला या नावाने उल्लेख आहे. नंदिनीची वसिष्ठांवर मोठी कृपादृष्टी होती. तिच्या कृपेमुळेच वसिष्ठांची प्रत्येक मनोकामना पूर्ण होत होती. विश्वामित्रांच्या इतक्या मोठ्या सेनेचा सत्कार व आतिथ्य तिच्यामुळेच होऊ शकले.

## विश्वामित्रांकडून नंदिनीची मागणी

जेव्हा विश्वमित्रांना नंदिनीबद्दलची माहिती मिळाली, तेव्हा ही गाय आपल्याजवळ असावी अशी इच्छा त्यांना झाली. ते एक सम्राट होते आणि प्रजा-पालनाचे कर्तव्य त्यांना पार पाडावे लागत होते. त्यांच्या मते वास्तविक एका ऋषीला त्या गायीचा काही उपयोग नव्हता.

त्यांनी वसिष्ठांना म्हटले "महर्षे, आपण ही आपली गाय मला द्यावी. तिच्या मोबदल्यात मी आपणाला अनेक वस्तू देतो."

परंतु वसिष्ठांना विश्वामित्रांची ही मागणी मान्य झाली नाही. वसिष्ठांना आपल्या आश्रमातील व्यवस्थेत कोणतीही उणीव वा कष्ट भासू नयेत, यासाठी कामधेनूने त्यांना नंदिनी प्रदान केली होती. यामुळे "मी ही गाय आपणाला देऊ शकत नाही," असे विश्वामित्र राजाना वसिष्ठांनी मोठ्या नम्रतेने सांगितले. विश्वामित्रांना नंदिनी देण्यास वसिष्ठ तयार नव्हते, कारण ती त्यांचे सर्वस्व होती. त्यांचे यज्ञयागादी कर्म, अग्निहोत्र, बली, होम, निरनिराळी

कर्मे नंदिनीवरच अवलंबून होती. शवला (नंदिनी) हीच त्यांचे धन, त्यांचे रत्न इतकेच नव्हे तर त्यांचे जीवन होती. म्हणून किती तरी अमूल्य रत्ने, सुवर्ण, निरनिराळ्या रंगांच्या एक कोटी गाई, विश्वामित्रांनी देऊ केल्या तरीही त्यांना कामधेनू देण्याचे वसिष्ठांनी अमान्य केले.

विश्वामित्र महाप्रतापी सम्राट होते. त्यांना आपल्या पराक्रमाचा गर्वही होता. वसिष्ठांच्या नकारामुळे ते क्रुद्ध झाले व कामधेनूला वलपूर्वक ओढून नेऊ लागले. ती अतिशय दु:खित झाली. विश्वामित्राच्या शेकडो सैनिकांना दूर झटकून वायुवेगाने ती वसिष्ठांजवळ आली व आक्रोश करीत त्यांना विचारू लागली, " भगवन्, विश्वामित्र राजाचे सैनिक मला आपणापासून दूर नेत आहेत, तेव्हा आपण माझा परित्याग केला आहे काय?" तेव्हा ब्रह्मर्षी वसिष्ठ त्या शोकविव्हल शबलेला म्हणाले "शवले, तुझा कोणताही अपराध नसताना मी तुझा त्याग कसा करीन ? हा वलवान राजा वलाने उन्मत्त होऊन तुला ओढून नेत आहे. त्याच्याजवळ वलसंपन्न एक अक्षौहिणी सैन्य आहे. त्या मानाने माझे सामर्थ्य

अगदीच अल्पसे आहे.

वसिष्ठांच्या या भाषणाचे तात्पर्य जाणून नंदिनी त्यांना म्हणाली "ब्रह्मन, ब्राह्मबल हे दिव्य असल्यामुळे क्षात्रबलापेक्षा अधिक प्रभावी आहे. आपले सामर्थ्य अजोड असून आपण मला आज्ञा द्याल तर मी त्याच्या गर्वाचा आणि सैन्याचा नाश करीन!" नंतर वसिष्ठांच्या आज्ञेने नंदनीने आपल्या शक्तीच्या योगाने हजारो सैनिक उत्पन्न करून विश्वामित्रांच्या सैन्याचा पूर्ण नाश केला.

या घटनेमुळे विश्वामित्रांचा क्रोधाग्नी अधिकच भडकला. संतप्त होऊन त्यांनी आपल्या शंभर पुत्रांना युद्धाची आज्ञा केली परंतु त्या सर्वांचाच युद्धात संहार झाला. आपल्या पुत्रांचा व सैन्याचा नाश झालेला पाहून विश्वामित्र अतिशय लज्जित झाले. त्यांना आपला पराजय मान्य करणे भाग पडले. त्यांचे सर्व बल व उत्साह नाहीसा झाला. आपल्या एका पुत्राला राज्यावर बसवून आपले सामर्थ्य वाढविण्यासाठी ते हिमालयातील किन्नरांच्या आणि नागांच्या प्रदेशात गेले. तेथे त्यांनी शंकराच्या आराधनेस प्रारंभ केला.

दीर्घकालपर्यंत तपश्चर्या करूनही भगवान प्रसन्न न झाल्यामुळे त्यांनी आपली तपश्चर्या अधिक उग्र केली. त्यानंतर महादेव प्रसन्न झाले व त्यांनी विश्वामित्र राजाला वर मागण्यास सांगितले.

श्रीशंकराच्या दर्शनाने विश्वामित्रांच्या आनंदास पारावर उरला नाही. त्यांनी शंकराला नमस्कार करून 'युद्धाचे सर्व रहस्य व मंत्र मला प्राप्त होवोत' असा वर मागितला. "तथास्तु" असे म्हणून भगवान अन्तर्धान पावले.

## वसिष्ठांवर पुनश्च आक्रमण

महादेवांकडून अस्त्रप्राप्ती झाल्यावर विश्वामित्रांना आपल्या सामर्थ्याचा अधिकच गर्व झाला. ते पुन: वसिष्ठांच्या आश्रमावर चालून गेले. प्रबळ वादळाच्या रूपाने ते वसिष्ठांच्या आश्रमावर तुटून पडले. त्यावेळी वसिष्ठ मुनी आपल्या नित्य कर्मात मग्न होते. विश्वामित्रांनी तेथे आपल्या अस्त्रांचा प्रयोग सुरू केला.

विश्वामित्रांच्या अस्त्रांचे तेज पाहून आश्रमातील

शेकडो मुनी भयभीत झाले व पळून गेले. त्यांचे शिष्य व पशुपक्षी सुद्धा सर्व दिशांना विखुरले. वसिष्ठांच्या तपस्येचा भंग झाला; ते डोळे उघडून पाहतात तो विश्वामित्र हातात खड्ग घेऊन उभे ! अत्यंत शांत-पणे वसिष्ठ उठले व त्यांनी आपला योगदण्ड त्वरेने उगारला. त्या दण्डाच्या प्रभावाने विश्वामित्रांची सर्व अस्त्रे, शस्त्रे व मंत्र निष्प्रभ झाले. ते हताश झाले आणि क्षात्रतेजापेक्षा ब्राह्मतेजाचे श्रेष्ठत्व त्यांनी मान्य केले.

## ब्रह्मदेवाची आराधना

तथापि विश्वामित्र सहजासहजी पराभव मान्य करणारे नव्हते. ब्रह्मर्षिपदाच्या प्राप्तीसाठी ब्रह्मदेवाची आराधना करण्याचा त्यांनी निश्चय केला आणि दक्षिण दिशेकडील वन्य प्रदेशांत जाऊन तपश्चर्येस प्रारभ केला.

## राजर्षी विश्वामित्र

अनेक वर्षे त्यांनी उग्र तपश्चर्या केल्यानंतर ब्रह्मदेव प्रसन्न झाले. ब्रह्मदेवांनी विश्वामित्रांना राजर्षिपदाचे



ब्रह्मदेवांनी विश्वमित्रांना राजर्षिपदाचे वरदान दिले.
परंतु त्यांचे समाधान झाले नाही.

वरदान दिले परंतु त्यामुळे विश्वामित्र संतुष्ट झाले नाहीत. त्यांना ब्रह्मर्षी होण्याची इच्छा होती त्यासाठी त्यांनी पुन: कठोर तप आरंभिले.

## त्रिशंकूची कथा

त्याच कालखंडातील एक घटना आहे. इक्ष्वाकू वंशातील एक राजा होता. त्याचे नाव 'त्रिशंकू'. त्याला आपण सदेह स्वर्गाला जावे, अशी इच्छा झाली. आपली इच्छा पूर्ण होण्यासाठी यज्ञ करण्याची विनंती करण्याकरिता आपले कुलगुरु वसिष्ठ यांच्याकडे तो आला.

वसिष्टांनी त्रिशंकूला समजावून सांगितले की कोणीही सशरीर स्वर्गाला जाणे शक्य नाही. वसिष्ठांनी याप्रमाणे नकार दिल्यामुळे त्रिशंकूला फार दु:ख झाले. त्यांच्या आश्रमातून बाहेर पडून राजा त्रिशंकू दक्षिण दिशेकडे जावयास निघाला. जाताना अरण्यात वसिष्ठांचे पुत्र तपश्चर्या करीत असताना त्याच्या दृष्टीस पडले. त्रिशंकू त्या गुरुपुत्रांजवळ गेला व म्हणाला, "गुरुपुत्रांनो, ज्यायोगे मी सदेह स्वर्गाला जाऊ शकेन असा एक यज्ञ करण्याची माझी इच्छा

आहे. वसिष्ठांनी नकार दिल्यामुळे मी आपणाला शरण आलो आहे, आपण माझे मनोरथ पूर्ण करा"– यावर वसिष्ठ–पुत्रांनी सुद्धा नकार दिला.

त्रिशंकू राजा होता. आपले कुलगुरू व त्यांचे पुत्र सुद्धा आपली इच्छा पूर्ण करू शकत नाहीत. हे पाहून तो जिद्दीस पेटला. "मी सशरीर स्वर्गाला जाऊनच दाखवीन" असा त्याने निश्चय केला. पुढे गेल्यावर त्याची विश्वामित्रांशी भेट झाली. एकदा अवर्षण पडले असताना विश्वामित्र आपला परिवार त्रिशंकूच्या राज्यात ठेवून स्वत: तपश्चर्येस निघून गेले होते. परत आल्यावर आपला कुटुंब-परिवार सुखरूप असल्याचे दिसल्यावर ते फार आनंदित झाले होते. आता त्याच त्रिशंकूला अशा हीनदीन अवस्थेत पाहून त्यांना सहजच त्याची दया आली. त्यांनी त्याला त्याच्या तशा स्थितीचे कारण विचारले.

त्रिशंकूने आपली सशरीर स्वर्गास जाण्याची इच्छा त्यांच्याजवळ व्यक्त केली. त्याबरोबर हेही सांगितले की कुलगुरू वसिष्ठ व त्यांचे पुत्र यांची या बाबतीत साह्य करण्याची थोडीही तयारी नाही.

हे ऐकून विश्वामित्रांचा उत्साह अधिकच वाढला ते म्हणाले, "राजन्, आपण निश्चित असा. मी तुम्हाला सदेह स्वर्गास पोचवीन."

विश्वामित्रांनी यज्ञाची तयारी सुरु केली. दूरदूरच्या ऋषि-मुनींना यज्ञासाठी आमंत्रण गेले. केवळ महोदय नावाचे एक ऋषी व वसिष्ठांचे शंभर पुत्र यज्ञात भाग घेण्यास तयार झाले नाहीत. विश्वामित्रांनी त्यांचा वध करविला.

## त्रिशंकू अधान्तरी

यज्ञास सुरुवात झाली होती. मंत्रोच्चारांसह हवन होऊ लागले. त्रिशंकूच्या हातून हविर्भाग ग्रहण करण्यास यज्ञदेवतांना आवाहन केले गेले. पण कोणतीही देवता यज्ञात येण्यास तयार होईना. त्यामुळे विश्वामित्र अतिशय संतप्त झाले. ते त्रिशंकूला म्हणाले, "देवता येत नसतील तर न येवोत, मीच आपल्या तपःसामर्थ्याने तुम्हाला स्वर्गास पाठवितो."

असे म्हणून विश्वामित्रांनी गर्जना केली. उपस्थित ऋषी पाहतच राहिले. त्रिशंकू वर स्वर्गाकडे जाऊ

लागला. त्याने देवलोकाला स्पर्श केल्याबरोबर देवेन्द्र क्रुद्ध झाले. त्यांनी त्रिशंकूला खाली ढकलले. देवेन्द्र म्हणाले, "गुरुशापाने भ्रष्ट झालेल्या व्यक्तीला स्वर्गात कोणतेच स्थान मिळू शकत नाही."

आता त्रिशंकू खाली डोके व वर पाय या शीर्षासनाच्या स्थितीत खाली येऊ लागला. त्रिशंकूची ही स्थिती पाहून विश्वामित्रांनी आपल्या तपोबलाने तेथेच सरळ अवस्थेत त्याला थांबविले. तेव्हा त्रिशंकू अधान्तरीच लटकत राहिला. विश्वामित्र तेजस्वी असून दुसऱ्या प्रजापतीप्रमाणेच होते. त्यांनी आपल्या सामर्थ्याने दक्षिणेला दुसरे एक सप्तर्षिमंडळ निर्माण केले आणि "मी दुसरा देवलोक निर्माण करीन, तेथे इन्द्राला स्थान राहणार नाही" अशी घोषणा केली. विश्वामित्रांच्या या घोषणेने ऋषी, सुर, असुर हे सर्व घाबरून गेले. देवतांनी विश्वामित्रांना नम्रतेने सांगितले की या त्रिशंकूला त्याच्या गुरूपासून अभय नाही. त्यामुळे सदेह स्वर्गात जाण्याचा त्याला अधिकार नाही. परंतु विश्वामित्रांनी नवीन स्वर्ग निर्माण करण्याचा आपला हेका सोडला नाही. ते म्हणाले की ज्या नक्षत्रमंडळाची ते निर्मिती करतील, तेथेच

त्रिशंकू सशरीर वास करील. विश्वामित्र आपल्या हटवादीपणाने जिंकले. परंतु आपण क्रोधावश झाल्याने आपल्या तपश्चर्येचे सारे फळ नष्ट झाले आहे, हेही त्यांच्या लक्षात आले. त्यांनी पश्चिमेकडे आपली दृष्टी स्थिर केली, ते पुष्कर तीर्थाला गेले व तेथे त्यांनी आपल्या तपश्चर्येस पुन: प्रारंभ केला.

त्रिशंकूला सदेह स्वर्गास पोचविण्याच्या विश्वामित्रांच्या या योजनेला सर्व देवगणांनी तीव्र विरोध केला होता. विधात्याचे म्हणणे मान्य करून विश्वामित्रांनी नवसृष्टिरचनेचे आपले कार्य थांबविले खरे, परंतु त्याचवेळी 'आपण आतापर्यंत निर्मिलेली प्रतिसृष्टी अक्षय्य टिकेल' हे आश्वासन त्यांच्याकडून मिळवून घेतले.


'प्रतिसृष्टी' म्हणजे काय ? प्रतिसृष्टी म्हणजे त्यांनी त्रिशंकूला दिलेले एक नवे तत्त्वज्ञान, नवीन कल्पना, नवा दृष्टिकोन ! या प्रयत्नात विश्वामित्रांची स्वतंत्र बुद्धी दिसून येते.

## अंबरीष व शुन:श्येप

याच कालात अयोध्येचा राजा अंबरीष एक महायज्ञ

करीत होता. त्या यज्ञाकरिता आणलेल्या पशूंची चोरी झाली. त्यामुळे अंवरीष राजाला फार दु:ख झाले. पशूंचा शोध करीत राजा रानावनात हिंडू लागला. मार्गात ऋचीक मुनींचा आश्रम त्यांना दिसला. ऋषींनी राजाची व्यथा ऐकून त्यास म्हटले "माझ्या पुत्रालाच यज्ञीय पशूऐवजी वळी द्यावे. मुनींना तीन पुत्र होते. त्यापैकी कोणत्या पुत्राचे वलिदान करावे, हा प्रश्न होता. कारण ज्येष्ठ पुत्र पित्याला प्रिय, व धाकटा मातेचा लाडका ! तेव्हा मधला पुत्र शुन:श्येप हाच उरला. एक लाख गायींच्या मोबदल्यात त्याला विकत घेण्याचे ठरले. शुन:श्येपाला हे रुचले नाही परंतु राजावरोबर जाणे मात्र भाग पडले. वाटेत ते पुष्कर तीर्थावर थांवले. तेथे विश्वामित्र तप करीत होते. ते शुन:श्येपाचे मामा होते.

आपल्या मामाला पाहिल्यावरोवर मुलाला रडू कोसळले. रडत रडत त्याने आपल्या मामाला सर्व घटना सांगितली. त्याने आपले प्राण वाचविण्याची व त्यावरोवरच अंवरीष राजाचा यज्ञ पूर्ण करण्याची विनंती विश्वामित्रांना केली. विश्वामित्रांचे अंत:करण द्रवले. त्यांनी वाल शुन:श्येपाचे सांत्वन केले व त्याला





त्रिशंकू राजाला सदेह स्वर्गात पाठविण्याचा प्रयत्न.

धीर दिला. त्याला एक मंत्र शिकवून विश्वामित्रांनी शुन:श्येपाला सांगितले की, "जेव्हा यज्ञात बली देण्याकरिता तुला यूपाजवळ नेतील व खांबास बांधतील तेव्हा भक्तिभावाने या मंत्राचा जप कर." तुझ्या केसालाही धक्का लागणार नाही."

विश्वामित्रांना नमस्कार करून त्यांचा आशीर्वाद घेऊन तो अंबरीष राजाकडे गेला. राजाने यज्ञास प्रारंभ केला. शुन:श्येपाला यूपास बांधले. तेव्हा त्याने विश्वामित्रांनी दिलेल्या मंत्राचा जप सुरू केला. तो मंत्र देवेन्द्राच्या स्तुतीचा होता. त्या स्तुतिस्तोत्राने इन्द्र व अन्य देवता संतुष्ट झाल्या, त्यांच्या आशीर्वादाने शुन:श्येपाचे प्राण वाचले आणि राजाचा यज्ञही पूर्ण झाला.

विश्वामित्रांची पुष्कर तीर्थावर तपश्चर्या सुरूच होती. एक हजार वर्षांनी ब्रह्मदेवांनी येऊन त्यांना 'ऋषी' ही पदवी दिल्याचे सांगितले. परंतु तेवढ्याने विश्वामित्रांचे समाधान झाले नाही; त्यांनी आपली घोर तपश्चर्या तशीच चालू ठेवली. त्यानंतर देवेन्द्राने त्यांच्या तपश्चर्येचा भंग करण्यास मेनका नामक अप्सरेला पाठविले. प्रथम ते मोहित झाले, परंतु

आपल्या प्रतिज्ञेचे स्मरण होताच विश्वामित्रांनी मेनका व आपली कन्या शकुंतला या दोघींचा त्याग केला आणि ते पुन्हा हिमालय पर्वतावर तपश्चर्येसाठी निघून गेले. यावेळी मात्र ब्रह्मदेवांनी प्रसन्न होऊन त्यांना "महर्षी" म्हणून संबोधिले. पण अजूनही विश्वामित्रांचे ध्येय पूर्ण झाले नव्हते. देवेन्द्राने त्यांची परीक्षा घेतली परंतु ते आपल्या साधनेपासून विचलित झाले नाहीत. अखेरीस ब्रह्मदेवांनी सर्व देवदेवतांसह येऊन त्यांना "ब्रह्मर्षी" असे म्हटले. विश्वामित्रांनी ब्रह्मदेवांना साष्टांग प्रणिपात केला. त्यांनी त्यांना म्हटले "आपण जरी मला 'ब्रह्मर्षी' म्हटले, तरी जोपर्यन्त वसिष्ठ मला 'ब्रह्मर्षी' म्हणत नाहीत, तोपर्यन्त मला संतोष होणार नाही."

## ब्रह्मर्षी विश्वामित्र

सर्व देवतांच्या विनंतीमुळे वसिष्ठ विश्वामित्राकडे आले व त्यांनी विश्वामित्रांना 'ब्रह्मर्षी' म्हणून संबोधिले. याप्रमाणे विश्वामित्रांची साधना सफल झाली.

एके दिवशी देवलोकात सर्वांची एक सभा झाली त्या सभेत देवेन्द्राने वसिष्ठ मुनींना विचारले, "हे

महातपस्वी वसिष्ठ मुने, आपल्या शिष्यवर्गात अत्यन्त धैर्यशील सत्यवचनी कोणी आहे काय ?"

यावर वसिष्ठ उत्तरले "देवेन्द्र, सूर्यवंशाचा राजा हरिश्चंद्र महान् सत्यशील आहे." विश्वामित्रही त्या सभेत उपस्थित होते. त्यांना वसिष्ठांचे हे बोलणे रुचले नाही. ते तत्काल उठले. देवेन्द्राकडून वसिष्ठ ऋषींना महत्त्व दिले गेले ही गोष्ट त्यांना आवडली नाही. त्यांनी तेथेच प्रतिज्ञा केली, की वसिष्ठांच्या या शिष्याचे सत्यव्रत मी नष्ट करूनच दाखवीन."

## हरिश्चंद्राची सत्वपरीक्षा

अशी प्रतिज्ञा करून विश्वामित्र भूलोकावर परत आले. हरिश्चंद्राची सत्वपरीक्षा पाहण्यासंबंधी ते विचार करीत होते तोच त्यांना कळले की राजा हरिश्चंद्र 'बहुसुवर्ण' नावाचा यज्ञ करणार आहे. वसिष्ठ मात्र त्या यज्ञात उपस्थित राहणार नाहीत. विश्वामित्र त्या यज्ञस्थानी पोहचले. राजाने त्यांचे यथोचित स्वागत व आतिथ्यसत्कार केला "मुनिवर, आणखी काय आज्ञा आहे?" असे त्याने विश्वामित्रांना विचारले. विश्वामित्र म्हणाले "एका मोठ्या विशाल

हत्तीवर एका व्यक्तीला उभे करा. तो एक लहान कवडी वर उंच फेकेल. ती कवडी जितक्या उंचीवर जाईल तितक्या उंचीचा सोन्याचा ढीग लावून मला दान करा."

तात्कल हरिश्चंद्र राजा म्हणाला "महाराज माझे भांडार सोन्याने भरलेले आहे. त्याचा स्वीकार करावा" या उत्तराने विश्वामित्र चकित होऊन निरुत्तर झाले. मनातल्या मनात आपला पराजय मानून त्यांनी राजाला म्हटले "राजा, मी प्रसन्न झालो आहे. हे सुवर्ण तुझ्याजवळच असू दे. जेव्हा गरज पडेल तेव्हा मी स्वतःच मागून घेईन." विश्वामित्र आपल्या आश्रमात परत आले. ते विचार करू लागले. शेवटी त्यांनी रानटी हिंस्र पशू निर्माण करून हरिश्चंद्राच्या प्रजेला त्रास देण्यासाठी त्यांना पाठविले त्रस्त प्रजा राजाकडे गेली. हरिश्चंद्र राजा त्या पशूंची शिकार करण्यास अरण्यात गेला.

नंतर विश्वामित्र ब्राह्मण वेषाने राजाच्या स्वप्नात गेले, आणि स्वप्नात त्यांनी राजाजवळ त्याचे संपूर्ण राज्य दान म्हणून मागितले. दुसऱ्या दिवशी राजा आपल्या अमात्यगणाजवळ स्वप्नाविषयी चर्चा करीत

असतानाच विश्वामित्र तेथे पोहोचले व म्हणाले, "राजा, तू आपले सर्व राज्य मला दान केले आहेस आता राज्य व शिवाय दक्षिणा दे." संपूर्ण राज्य दान केल्यावर राजा दक्षिणा कुठून देणार ? त्याने आपली पत्नी व पुत्र यांना विकून ऋषींची दक्षिणा तर चुकती केली आणि स्वतः राजा एका डोंबाच्या घरी चाकरीस राहिला. राजा हरिश्चंद्राची सत्वपरीक्षा एवढ्यानेच संपली नाही. इतका सत्वशील राजा पण केवढी ही त्याची दुर्दशा ! ! राजाच्या सर्व प्रजाजनात हाहाकार झाला.

त्याच वेळी हरिश्चंद्रपुत्र रोहिताश्व याचा सर्पदंशाने मृत्यू झाला. राणीच्या पुत्राचे प्रेत स्मशानात अंत्यसंस्कारासाठी नेले गेले. राजाने स्वतः ते पाहिले पण आपले दुःख विसरून तो कर्तव्यकठोर बनला आणि कर न देता शवाचे दहन करण्यास त्याने अनुमती नाकारली. राणी तारामती विलाप करू लागली. राजाचे अंतःकरणही मूक रुदन करीत होते. पण आपल्या कर्तव्याविषयी तो निश्चल होता. राणी तेथून निघून गेली. तेव्हा बाहेर राज़सेवकांनी तिच्यावर बालकहत्त्येचा आरोप लादला व तिला पकडले.

राणीचा शिरच्छेद करण्याची आज्ञा दिली गेली. हे कामही डोंबाचा सेवक म्हणून राजा हरिश्चन्द्राकडेच आले. राजाने कठोर हृदयाने राणीचा शिरच्छेद करण्यास खड्ग उगारले, तोच महादेवांनी प्रकट होऊन त्याचा हात वरच्या वर धरला. श्रीशंकरांनी राजाच्या सत्यशीलतेची प्रशंसा केली आणि त्याच्या पुत्राला जिवंत केले. विश्वामित्रही प्रकट झाले. त्यांनी राजाची स्तुती करून त्याचे राज्य त्याला परत दिले.

विश्वामित्र अतिशय पराक्रमी होते. परंतु असे पराक्रमी विश्वामित्रही आपल्या जीवनात जे संकल्प साकार करू शकले नाहीत, ते सर्व श्रीरामचंद्रांनी आपल्या जीवनात यथायोग्यपणे साकार केले. विश्वामित्रांची संकल्पशक्ती प्रथम केवळ स्वतःच्या अहंकाराचे प्रदर्शन करण्यात खर्ची पडली, परंतु भगवान रामचंद्राच्या अवतारानंतर तिचा योग्य विनियोग झाला. पुरुषार्थ व संकल्प यांच्या सदुपयोगाबरोबरच विश्वामित्रांना आपल्यामध्ये असलेल्या दोषांची, उणिवांचीही जाणीव झाली. महर्षी विश्वामित्रांच्या यज्ञाचा जेव्हा राक्षस नाश करू लागले, तेव्हा प्रथमच त्यांना कळले की हे काम केवळ पराक्रमाने साध्य होऊ शकत नाही.

पुरुषार्थाच्या बलावर क्षत्रियालाही ब्राह्मणत्व प्राप्त करता येते, या गोष्टीवर विश्वामित्रांचा विश्वास होता, तर दुसरीकडे त्यांच्यासमोर पुरुषार्थाचा अत्यंत दुरुपयोग करणाऱ्या रावणाचे उदाहरणही होते. तो तर पुरुषार्थाच्या द्वारे प्रत्यक्ष मृत्यूवरही मात करण्याचा प्रयत्न करीत होता. त्याने विश्वातील सर्वशक्तींना आपल्या अनुकूल करून घेतले होते. पुरुषार्थाच्या इतक्या अतिरेकावर कोणाचे तरी नियंत्रण असणे आवश्यक होते. मारीच व सुबाहू यज्ञस्थानावर येऊन यज्ञाचा विध्वंस करीत होते. विश्वामित्रांना यज्ञ कसा पूर्ण होईल याची चिंता वाटू लागली. आणि इतके सर्व झाल्यानंतर त्यांना ज्ञान झाले की—"हरि बिनु मरहिं न निसिचर पापी – हरिकृपेवाचून या पापी राक्षसांचा नाश होणे शक्य नाही" 'परमेश्वराच्या कृपेवाचून यज्ञाची पूर्ती होऊ शकणार नाही. जे काही कमी अधिक असेल ते प्रभूच्या नामप्रभावाने पूर्ण होवो' या भावनेचा उदय त्यांच्या अंत:करणात झाला—आणि त्यांचा अहंकार दूर झाला.

राक्षसांवर विजय मिळविणे हे केवळ आपल्या शक्तीने होऊ शकणार नाही. त्यासाठी ईश्वरी कृपा-

प्रसाद हवा हे त्यांच्या लक्षात आले. ते विचार करू लागले, ईश्वर कोठे मिळेल ? आणि त्यांना राम–लक्ष्मणांचे स्मरण झाले. हा मोठा चमत्कारिक योगायोग आहे की क्षत्रियत्वापासून ब्राह्मणत्व मिळविण्यासाठी अहंकाराच्या व पुरुषार्थाच्या जोरावर संघर्ष करीत असणाऱ्या विश्वामित्रांना अखेर एका क्षत्रियाचेच साह्य घेण्याची प्रेरणा मिळाली. आणि तोही एक असा क्षत्रिय की ज्याचे गुरू वसिष्ठ होते ! वसिष्ठांशी तर विश्वामित्रांचा जन्मभर संघर्ष होता. परंतु राग-द्वेष या दोहोंचा तसेच जाती व तपस्या यांचा अभि-मान सोडून वसिष्ठांशी समेट करण्यास ते तयार झाले. ही त्यांच्या जीवनातील एक मोठी क्रान्तीच म्हणावी लागेल.

वसिष्ठ-विश्वामित्रांबद्दल आणखीही अनेक कथा प्रचलित आहेत. या कथांमध्ये दोघांच्याही स्वभावाचे पैलू व्यक्त झाले आहेत. वसिष्ठ विश्वामित्रांना 'ब्रह्मर्षी' म्हणण्यास तयार नव्हते यामुळे संतप्त होऊन विश्वामित्र एकदा त्यांना जीवे मारण्याच्या हेतूने त्यांच्या आश्रमात गेले. रात्रीच्या वेळी आपल्या या कृष्णकृत्यास योग्य संधीची वाट पाहत ते लपून बसले.

ती रात्र पौर्णिमेची असल्यामुळे स्वच्छ चंद्रप्रकाश पडला होता. वसिष्ठ व त्यांची पत्नी अरुंधती आश्रमाच्या अंगणात वसले होते. अरुंधती म्हणाली "आज चंद्रप्रकाश किती निर्मल व तेजःपुंज आहे !" वसिष्ठांनी म्हटले "होय, खरोखरच ! विश्वामित्रांच्या तपस्येसारखाच आहे !"

अरुंधती आश्चर्यचकित झाली. तिने कुतूहलाने विचारले, "आपणाला विश्वामित्रांची तपस्या इतकी मान्य आहे"? वसिष्ठ उत्तरले–होय, प्रश्नच नाही" यावर अरुंधती म्हणाली, "मग आपण त्यांना 'ब्रह्मर्षी' का म्हणत नाही ?"

वसिष्ठ मुनी म्हणाले, "त्यांची तपस्या मान्य असूनही ते आपल्या क्रोधावर विजय मिळवू शकले नाहीत, या कारणामुळे त्यांना 'ब्रह्मर्षी' म्हणता येत नाही." उभयतातील हा संवाद ऐकून विश्वामित्र ओशाळले, व तेथून निघून गेले.

जेव्हा विश्वामित्र दशरथाच्या नगरीत पोहोचले, तेव्हा सर्वानाच आश्चर्य वाटले. विश्वामित्र अयोध्येत कसे, हा प्रश्न सर्वाना पडला. कारण वसिष्ठ कधी

जनकपुरास, आणि विश्वामित्र कधी अयोध्येस जात नव्हते. राम–सीता यांच्या शुभविवाहाच्या योगाने हे दोन मुनी एकत्र आले.

जनकपुराचा राजा 'निमि' याचे आचार्य वसिष्ठ होते. वसिष्ठांच्या अनुपस्थितीत निमि राजाने दुसऱ्या पुरोहितांना पाचारण करून यज्ञ करविला. त्यामुळे वसिष्ठांना राग आला व "जेथे आपल्या गुरूवर विश्वास नाही, तेथे राहण्यात काय अर्थ" असे म्हणून त्यांनी जनकपुर सोडले व ते अयोध्येस आले. वसिष्ठ अयोध्येत आल्यामुळेच विश्वामित्र तेथे जात नव्हते. अशा स्थितीत विश्वामित्रांच्या आगमनाची वार्ता मिळताच अयोध्येत सर्वांना आश्चर्य वाटणे स्वाभाविकच होते. वसिष्ठ व विश्वामित्र या दोन महान शक्ती एकत्र येणे, ही एक महान घटना होती. परस्पर मतभेद विसरून दोघे एकत्र आले.


रामलक्ष्मण विश्वामित्रांच्या आश्रमात राहत असताना त्यांनी राम–लक्ष्मणांना राजनीतीचे अनेक पाठ दिले. ताटका नावाच्या राक्षसीने उजाड केलेल्या प्रदेशात त्यांनी प्रवेश केला तेव्हा प्रथम तिचा वध

करण्यास विश्वामित्रांनी रामाला आज्ञा केली व ती स्त्री असल्यामुळे अवध्य असल्याचा विचार मनात आणू नये, हेही शास्त्रार्थाने पटवून दिले.

प्राचीन इतिहासाचे ज्ञान देत असतानाच विश्वामित्रांनी राम–लक्ष्मणांना युद्धविद्येचे रहस्यही शिकविले. त्याचबरोबर देशाच्या स्थितीची कल्पनाही हळुहळू दिली.

विश्वामित्रांचा यज्ञ निर्विघ्नपणे पार पाडण्याचे काम राम–लक्ष्मणांनी उत्तम रीतीने केले. यामुळे संतुष्ट होऊन ऋषि-मुनींनी त्यांना आशीर्वाद दिले. त्यानंतर जनकपुरास होणार असलेल्या स्वयंवर–समारंभाकरिता विश्वामित्र त्यांना आपल्याबरोबर घेऊन गेले. विश्वामित्रांनी या दोन्ही राजकुमारांमधील क्षत्रिय वृत्ती जागृत केली.

विश्वामित्र अतिशय दूर दृष्टीने पाऊल उचलीत. एकीकडे लोकांमध्ये एक प्रकारची पराभूत मनोवृत्ती होती तर दुसरीकडे रामचंद्राच्या ठायी असलेला आत्मविश्वास व कर्तव्यनिष्ठा या गुणांची माहिती लोकांना नव्हती. या स्थितीत विश्वामित्रांना परिवर्तन



राम-लक्ष्मणांना युद्धविद्या देताना.

घडवून आणावयाचे होते. श्रीरामचंद्राच्या पराक्रमाचा प्रभाव लोकांना दाखवावयाचा होता. आणि ते शिवधनुष्याचा भंग करू शकतात, याबद्दल त्यांना विश्वास होता.

रामायणातील एक प्रसंग विशेष ध्यानात घेण्याजोगा आहे. विश्वामित्रांबरोबर रामलक्ष्मण जनकपुरास येतात. जनक-कन्या जानकीच्या स्वयंवरात सहभागी होतात. श्रीरामचंद्र शिवधनुष्य उचलून त्यावर प्रत्यंचा चढवितात, तोच धनुष्याचे दोन तुकडे होतात. जानकी आपली वरमाला श्रीरामचंद्राच्या गळ्यात घालते.

श्रीरामचंद्रांनी ज्याचा भंग केला ते शिवधनुष्य परशुरामांना स्वत: शंकरांनी दिलेले होते, या शिवधनुष्याचा भंग करणारा कोण आहे, याचा शोध करीत स्वत: परशुराम तेथे आले, तेव्हा विश्वामित्रांनी रामांना म्हटले, "रामचंद्रा, भगवान परशुरामांना प्रणिपात कर."

योगायोग असा की परशुरामांचे पिता जमदग्नी यांच्याजवळ 'कामधेनू' नावाची गाय होती. ह्या गाई-

कडून ऋषींच्या, आश्रमातील सर्व गरजा पूर्ण होत होत्या. तिची ही कीर्ती जेव्हा सहस्रार्जुन नावाच्या महाप्रतापी राजाने ऐकली तेव्हा त्याने जबरदस्तीने कामधेनूला जमदग्नीजवळून ओढून नेले. परशुरामांना याचे फार दु:ख झाले. त्यांच्या मनात विचार आला की आपले वडील अहिंसक असल्यामुळेच हिंसक सहस्रार्जुनाने त्यांच्यावर विजय मिळविला. केवळ अहिंसेने जगात भागत नाही. याकरिता परशुरामांनी आपला परशू उचलला. अन्यायाविरुद्ध युद्ध पुकारले. स्वत: ब्राह्मण असूनही क्षत्रिय धर्म स्वीकारला.

या उलट विश्वमित्रांचे जीवन आहे. याच कामधेनूची पुत्री नंदिनी वसिष्ठ ऋषींच्या आश्रमात होती आणि तिला बलपूर्वक नेता न आल्यामुळे विश्वमित्रांनी ब्रह्मर्षी होण्याकरिता अविश्रान्त परिश्रम केले.

हेच ते परशुराम आणि विश्वामित्र रामचंद्रांकडून शिवधनुर्भंग झाल्यावर भेटतात. रामचंद्राला बरोबर नेण्यास विश्वामित्र दशरथाच्या सभेत गेले, रामलक्ष्मणांना त्यांनी शस्त्रविद्या दिली. आणि परशुरामांनी रामचंद्राची भेट झाल्यावर शस्त्र समर्पण केले. केवळ

प्रतिक्रियेपायी घेतले गेलेले निर्णय तात्कालिक असतात. त्यांना शाश्वत मूल्य किंवा महत्त्व नसते; हेच या भेटीमुळे सिद्ध झाले आहे.

श्रीरामचंद्रांनी वसिष्ठ आणि विश्वामित्र या दोघांनाही आपल्या गुरुस्थानी मानले होते. त्यांनी दोघांनाही एका सूत्रात बांधले. विश्वामित्रांची संकल्प-शक्ती अहंकाराच्या प्रदर्शनात व्यर्थ दवडली जात होती. श्रीरामचंद्रांच्या सम्पर्कानंतर तिचा सदुपयोग झाला. संकल्प व पौरुष यांच्या योग्य उपयोगाबरोबरच त्यांना आपल्यातील उणिवांची व दोषांची जाणीव झाली. त्यांना हे समजून चुकले की कोणतेही संपूर्ण कार्य केवळ हिंसेच्या बळाने तडीस जात नाही तर केवळ अहिंसेनेही होत नाही. दोन्हींचा समन्वय आवश्यक आहे. जोपर्यन्त समाजात पशुवृत्ती आहे तोपर्यन्त शस्त्र आवश्यक आहे. पण नंतर मात्र त्या शस्त्राचा त्यागही महत्त्वाचा आहे.

श्रीरामचंद्र व परशुराम यांच्यातील संवाद अत्यंत अर्थपूर्ण आहे. श्रीरामचंद्रांनी परशुरामांना विचारले, की " आपल्या प्रवासात आपल्याला देशाची परिस्थिती

कशी दिसली?" परशुरामांनी उत्तर दिले "प्रथम देश धनधान्याने युक्त होता. लोक आनंदात होते. पण आता संपूर्ण देश उजाड झालेला दिसतो."

यावर रामचंद्रानी त्यांना सांगितले की, "देशाची सुरक्षितता कायम राखण्याकरिता आवश्यक असलेल्या क्षत्रियवर्गाचा आपणाकरवी नाश झाला. क्षात्र तेज नाहीसे झाल्यामुळेच आक्रमण अधिक प्रमाणात होत गेले. त्यामुळे देश उजाड झाला."

या श्रीराम-परशुराम भेटीमुळे पुन: क्षात्रवृत्ती वाढण्यास प्रेरणा मिळाली. क्षत्रिय असूनही जे विश्वामित्र ब्रह्मतेजाच्या प्राप्तीकडे झुकले होते, ज्यांनी वसिष्ठांबरोबर याकरिता संघर्ष केला, तेच ज्ञानप्राप्तीनंतर या नव्या युगाच्या निर्मितीकरिता रामलक्ष्मणांना घेऊन पुन: शौर्याकडे वळले. नव्या पिढीला हा दृष्टिकोन देऊन त्यांनी एकप्रकारे वास्तविक मार्गाचे ज्ञानच दिले.

आता ते पूर्वीचे विश्वामित्र राहिले नव्हते. सारे राग, द्वेष विसरले होते. विश्वामित्र व वसिष्ठ यांच्यातील परस्पर रागद्वेष संपले होते. यामुळेच जेव्हा

विश्वामित्रांनी दशरथाजवळ रामलक्ष्मणांची मागणी केली, तेव्हा राजा या बाबतीत कां, कू करीत असलेला पाहून वसिष्ठांनी त्याला समजाविले, ते म्हणाले, ही मुले तुला यज्ञाच्या कृपाप्रसादाने प्राप्त झाली आहेत. तेव्हा यज्ञरक्षणार्थ तू यांना देणार नाहीस, हे कसे ? घेताना संकोच वाटत नाही, आणि देताना मात्र संकोच ? यज्ञपुत्र यज्ञरक्षणार्थ द्यावेच लागतील."

विश्वामित्रांनी रामलक्ष्मणांना नेऊन यज्ञपूर्ती केली.

## रामायणकालीन विश्वामित्र

रामायणात विश्वामित्रांचे स्थान अतिमहत्त्वाचे आहे. राजा दशरथाच्या नेत्रांना नक्षत्राप्रमाणे असणाऱ्या नयनाभिराम रामलक्ष्मणांना आपल्याबरोबर नेऊन ऋषि-मुनींच्या यज्ञात बाधा आणणाऱ्या राक्षसांना नष्ट करण्यात ते सफल झाले.

प्रथम तर दशरथाला चिंताच वाटत होती. इतकी अल्पवयीन कोवळी बालके राक्षसांशी संघर्ष कसा करू शकतील, हा विचार राजाला त्रस्त करीत होता. परंतु रामलक्ष्मणांच्या पराक्रमाविषयी तिळमात्रही शंका

वाळगू नये असे विश्वामित्रांनी त्याला सांगितले. कुलगुरू वसिश्ठांचाही असाच आग्रह पडल्यामुळे राजाने त्यांना मान्यता दिली.

मार्गात विश्वामित्रांच्या निर्देशावरूनच रामाने ताटका राक्षसीचा वध केला. विश्वामित्र आश्रमात पोहोचल्यावर त्यांनी यज्ञास प्रारंभ करताच, मारीच, सुबाहु आणि इतर राक्षस तेथे आले. श्रीरामाने त्यांनाही मारले. यामुळे विश्वामित्रांना फार आनंद झाला.

त्याच काळात मिथिलेचा राजा जनक याने आपली कन्या जानकी हिचे स्वयंवर योजिले होते. विश्वामित्र रामलक्ष्मणांसह मिथिलेकडे निघाले. वाटेत गौतम ऋषींचा आश्रम होता. तो उजाड आश्रम पाहून राम व लक्ष्मण या दोघांनाही फार आश्चर्य वाटले. विश्वामित्रांनी त्यांना सांगितले की गौतम ऋषींच्या शापाने त्यांची पत्नी अहल्या शिला होऊन पडली आहे. रामाच्या पद-स्पर्शाने त्यांनी अहल्येचा उद्धार केला.

या विषयीची कथा अशी की अहल्या ही गौतम ऋषींची पत्नी होती. ती अतिशय सुंदर होती.

देवांचा राजा इंद्र याला तिच्याबद्दल अभिलाषा होती. परतु ब्रह्मदेवांनी तिचा गौतमाशी विवाह करून दिला. एकदा गौतम ऋषी स्नानाकरिता, बाहेर गेले होते. देवराज इंद्र आश्रमात गेले. त्याचवेळी गौतम परत आले आणि त्यांनी इंद्राला पाहिले. तेव्हा इंद्राने अहल्येला पापमार्गाकडे प्रवृत्त केले की काय, अशी शंका गौतमांच्या मनात येऊन त्यांनी इंद्राला शाप दिला व अहल्येलाही "शिला हो," असा शाप दिला. अहल्येने विनवणी केल्यावर गौतमांनी "भगवान रामचंद्रांकडून तुझा उद्धार होईल," असा उ:शापही दिला.

भावी युवराजपदावर आरूढ होणाऱ्या श्रीरामचंद्रांना समाजाच्या स्थितीचे यथायोग्य ज्ञान असणे आवश्यक आहे, असे विश्वामित्रांना वाटत होते. समाजात लहान लहान दोषांमुळे ज्या स्त्रियांना तिरस्कृत केले जात असे अशांचा त्यांनी उद्धार करावा, समाजजागृती करावी. हे सामाजिक जागृतीचे शिक्षण श्रीरामचंद्रांना त्यांनी प्रत्यक्ष दिले.

याप्रमाणे शस्त्रास्त्र विद्येत निपुण बनवून त्याबरोबरच राजाच्या कर्तव्याचे ज्ञान विश्वामित्रांनी राम-

चंद्रांना देऊन एक नवी दृष्टी दिली.

मिथिलेला पोहचल्याबरोबर विश्वामित्रांच्या सूचनेवरून रामाने स्वयंवरात भाग घेतला आणि सीतेची प्राप्ती करून घेतली.

विश्वामित्र असामान्य साहसी, आणि अलौकिक सामर्थ्यशाली होते. आपल्या महत्त्वाकांक्षा पूर्ण होईपर्यंत अविरत प्रयत्न करीत राहण्याचा त्यांचा स्वभाव होता. म्हणूनच प्राचीन भारताच्या इतिहासात त्यांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले.

• • •

शाखा.
१३१४ / दि. ६।१।८२

विविधतेत एकतेचे दर्शन
भाषिक एकात्मतेचा अनुभव

# " गीत - भारती "

आपल्या देशातील १४ भाषांमधील ६६ राष्ट्रीय गीते
देवनागरी लिपीत
सोबत त्यांचा हिन्दी भावार्थ

आकार १/८ क्राऊन : पृष्ठ-संख्या १५०

मूल्य केवळ रु. ४–५०

प्राप्ति-स्थान
भारत-भारती
बाल-पुस्तकमाला
रुईकर पथ, नागपूर–४४० ००२

॥ श्री: ॥

# भारत - भारती

## बाल-पुस्तकमाला

( मराठी )

१. स्वामी विवेकानंद
२. स्वातंत्र्यवीर सावरकर
३. पं. दीनदयाल उपाध्याय
४. नचिकेता
५. भगिनी निवेदिता
६. वीर अभिमन्यू
७. विश्वामित्र
८. लाला लजपतराय
९. महासती द्रौपदी
१०. संत गुलाबराव महाराज
११. गुरुपुत्र फतेहसिंह, जोरावरसिंह
१२. छत्रपती शिवाजी
१३. बाहुबली
१४. भगवान महावीर

१५. डॉक्टर आंबेडकर
१६. केळादि चेन्नम्मा
१७. समर्थ रामदास
१८. भक्त प्रह्लाद

□

BVBK-0401314

किंमत प्रत्येकी रुपये २-००